| | |
|---|---|
| | **संकीर्ण अर्ज क्र. ०४/२०२६**<br><br>श्याम श्रीकृष्ण चेडे<br><br>**- वि-**<br>शिक्षण प्रसारक मंडळ, अकोट व इतर |

**<u>निशाणी १ व ५ खालील पारित एकत्रित आदेश</u>**
(पारित दिनांक १२.०२.२०२६)

अपील दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यासाठी अर्जदार श्याम चेडे यांनी प्रस्तूतचा अर्ज सादर केलेला आहे. परंतू दिनांक २२.०१.२०२६ रोजी हा विलंब माफीचा अर्ज दाखल करते वेळी अर्जदाराने विलंब माफीच्या अर्जासोबत अपील मेमो दाखल केला नव्हता. त्यामुळे दिनांक २२.०१.२०२६ रोजी निशाणी १ वर आदेश पारित करून प्रस्तूत प्रकरण हे युक्तीवादासाठी ठेवण्यात आले. दिनांक २३.०१.२०२६ रोजी अर्जदार तर्फे निशाणी ५ वर अर्ज सादर करण्यात येवून अपील मेमोची प्रत विलंब माफीच्या अर्जासोबत जोडण्याची विनंती करण्यात आली आहे. अपील मेमोची प्रत सादर करून अर्जदाराने त्याच्या अर्जातील तांत्रिक त्रुटी दुर केलेली आहे. अपील मेमो प्रकरणात जोडण्याची परवानगी याव्दारे देण्यात येते. त्यामुळे आता या प्रकरणात गैरअर्जदार पक्षांना विलंब माफीच्या अर्जाची नोटीस जारी करण्यात येते. येथे स्पष्ट करण्यात येते की, अर्जदार पक्षाचा विलंबाचा काळ हा अर्ज दाखल तारीख २२.०१.२०२६ ऐवजी अपील मेमो सादर करण्याची तारीख दिनांक २३.०१.२०२६ पर्यंत विचारात घेण्यात येईल.

अमरावती
दिनांक – १२.०२.२०२६

(आनंद या. बोरकर)
पीठासीन अधिकारी,
शाळा न्यायाधिकरण, अमरावती